Estd. 1962
NAAC "A" Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

कोरोना विषाणूच्या अनुषंगाने विद्यापीठ कार्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी जोखीम पत्करून कामावर उपस्थित असतात. अशा सेवकांचा विमा उतरविण्याच्या अनुषंगाने दि.३१/०७/२०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठरावानुसार सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांचा विमा उतरविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येणार आहे.

यास्तव आपल्या विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांची कार्यालयात उपलब्ध असलेली Excel Sheet मधील माहिती आपणास ई-मेल करण्यात आली असून, सदरची माहिती तपासून घ्यावी व काही बदल असल्यास त्यामध्ये आवश्यक त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात. तसेच कार्यालयास आवश्यक असणारी उर्वरीत माहिती भरून दि.०४/०८/२०२० रोजी दु. १२:०० पर्यंत est@unishivaji.ac.in या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावी. तसेच सदरच्या माहितीची हार्ड कॉपी विभागप्रमुखांच्या सहीनीशी देखील पाठविण्यात यावी. ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांना रक्तदाब, मधूमेह, किडनी व ह्यदयाशी संबंधित किंवा इतर आजार असल्यास त्याची माहिती रकाना क्र. १५ मध्ये देणे अनिवार्य आहे, असे न केल्यास उपचारादरम्यान सदरच्या आजाराची माहिती झाल्यास विमा संरक्षण, विमा कंपनीने नाकारल्यास त्याची जबाबदारी संबंधितांवर राहील. याची सर्वांनी नोंद घ्यावी. सदर यादीमध्ये आपल्या विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव अनावधनाने राहून गेले असल्यास, अशा अधिकारी / कर्मचाऱ्याची माहिती भरून देण्यात यावी.

**कुलसचिव**

**जा.क्र. एसयुके/आस्थापना-२ /** १२३८ **दिनांक :-** 03 AUG 2020

**प्रति,**

१. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र
४. संचालक, विद्यार्थी कल्याण
५. सर्व रेक्टर्स

**सदरचे परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी / सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

**प्रत :-** मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय.